


मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पिंपरी-चिंचवडमधील दोन नाट्यगृहे बंद!

## एक दुरुस्तीसाठी बंद, दुसरे डिसेंबरपर्यंत आरक्षित; कार्यक्रमांसाठी तारखा मिळेनात

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड शहरातील दोन प्रमुख नाट्यगृहे बंद असल्याने सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणाऱ्या संस्था आणि आयोजकांची गैरसोय होत आहे. भोसरीतील कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह दुरुस्तीसाठी बंद ठेवण्यात आले आहे, तर आकुर्डी येथील ग. दि. मा. नाट्यगृह सुधारित प्रारूप विकास योजना आराखड्याच्या सुनावणीसाठी डिसेंबरपर्यंत आरक्षित करण्यात आले आहे. त्यामुळे शहरातील नाटके, सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय स्पर्धा आणि पुरस्कार सोहळ्यांसाठी नाट्यगृह मिळवताना आयोजकांना धावपळ करावी लागत आहे.**



भोसरीतील कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहात छताला गळती लागणे, खुर्च्या तुटणे आणि ध्वनियंत्रणा खराब होणे अशा समस्या निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे महापालिका प्रशासनाने हे नाट्यगृह दुरुस्तीसाठी बंद केले आहे. मात्र, दुरुस्तीचे काम कधी पूर्ण होणार आणि नाट्यगृह पुन्हा सुरू कधी होणार, याबाबत निश्चित कालमर्यादा स्पष्ट करण्यात आलेली नाही.

दुसरीकडे, आकुर्डी येथील ग. दि. मा. नाट्यगृहात सुधारित प्रारूप विकास योजना आराखड्याच्या सुनावण्या सुरू आहेत. या कामासाठी प्रशासनाने नाट्यगृह डिसेंबरपर्यंत आरक्षित केले आहे. परिणामी, शहरातील अन्य नाट्यगृहांवर कार्यक्रमांचा भार वाढला आहे.

चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात कार्यक्रमांसाठी मोठी गर्दी होत असून, बुकिंग तीन महिने आधीच पूर्ण होत आहे. त्यामुळे इच्छित तारखेला कार्यक्रम आयोजित करणे संस्थांना कठीण झाले आहे. काही संस्थांना कार्यक्रम पुढे ढकलावे लागत आहेत, तर काहींना पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृह किंवा पिंपरीतील आचार्य अत्रे रंगमंदिराचा पर्याय निवडावा लागत आहे.

महापालिकेने नागरिकांच्या सांस्कृतिक गरजा पूर्ण करण्यासाठी नाट्यगृहांची उभारणी केली आहे. मात्र, कार्यक्रमांसाठी ऑनलाइन बुकिंग करताना पुढील तीन महिन्यांच्या कालावधीतील तारखा उपलब्ध करून दिल्या जातात. अशा परिस्थितीत राजकीय हस्तक्षेप केल्यानंतर काही आयोजकांना हव्या त्या तारखा मिळतात, अशी चर्चा कलाकार आणि सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींमध्ये आहे. सार्वजनिक नाट्यगृहांच्या बुकिंग प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेप का होतो, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

### इंटरनेट आणि लिपिकाअभावी आकडेवारी मिळेना

शहरातील दोन नाट्यगृहे उपलब्ध नसल्याने सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनावर परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत बंद नाट्यगृहांची दुरुस्ती वेळेत पूर्ण करणे, आरक्षणाबाबत स्पष्टता ठेवणे आणि बुकिंग प्रक्रिया पारदर्शक करणे आवश्यक असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात यंदा किती कार्यक्रम झाले, याची आकडेवारी मिळविण्यातही अडचणी येत आहेत. प्रेक्षागृहात इंटरनेटची सुविधा नसणे आणि लिपिक उपलब्ध नसणे, ही कारणे देऊन व्यवस्थापनाकडून आकडेवारी उपलब्ध करून देण्यास टाळाटाळ होत असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे प्रेक्षागृहातील कार्यक्रमांची नेमकी संख्या आणि वापराची स्थिती स्पष्ट होत नाही.

# पिंपळे गुरव, नवी सांगवीत दुर्गामाता दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपळे गुरव आणि नवी सांगवी परिसरात यंदाही श्री दुर्गामाता दौड उत्साहात पार पडत आहे. २०२० मध्ये मोजक्या कार्यकर्त्यांच्या सहभागातून सुरू झालेल्या या उपक्रमाचा विस्तार आता मोठ्या समुदायापर्यंत झाला आहे. तरुणांमध्ये शिस्त, संस्कार, धर्मजागृती आणि सामाजिक एकतेची भावना रुजविण्याच्या उद्देशाने या दौडीचे आयोजन केले जात आहे.**





राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांतून प्रेरणा घेत या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांनी विविध जाती-धर्मातील मावळ्यांना एकत्र आणून स्वराज्याची स्थापना केली. त्याचप्रमाणे समाजातील भेदभाव दूर करून तरुणांनी एकत्र यावे, सामाजिक बांधिलकी जपावी आणि योग्य मार्गाने वाटचाल करावी, हा संदेश दुर्गामाता दौडीतून दिला जात आहे.

२०२० मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाला सुरुवातीला मोजक्या कार्यकर्त्यांचा सहभाग होता. मात्र, सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे दौडीतील सहभागींची संख्या वाढत गेली. या माध्यमातून तरुणांमध्ये शिस्त, संघभावना आणि संस्कारांची रुजवण होत असून, अनेक युवक सामाजिक कार्यासाठी पुढे येत असल्याचे आयोजकांनी सांगितले

या दौडीत सहभागी झालेले सामाजिक कार्यकर्ते संजय मराठे म्हणाले, “आजच्या तरुण पिढीने श्री दुर्गामाता दौडीत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे. आपल्या पारंपरिक मराठी संस्कृतीचे संस्कार आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती-धर्मातील मावळ्यांना एकत्र आणून हिंदवी स्वराज्य उभारल्याची प्रेरणा तरुणांनी घ्यावी.”

दौडीच्या माध्यमातून समाजातील तरुणांनी एकत्र येऊन सामाजिक कर्तव्याची जाणीव ठेवावी, असे आवाहनही करण्यात आले. धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्यासोबतच सामाजिक एकोपा वाढविण्यावर या उपक्रमात भर दिला जात आहे.

नवी सांगवी विभागात दौड सुरू करण्यासाठी निशिकांत वानखडे, सुशांत पोतदार, साई कोढरे, सचिन बंडगर, अजिंक्य बोरडे, स्वप्नील सावंत, अमोल सुतार, प्रशांत ढोबळे, शुभम गावडे, भागवत भांडे, ओमकार भिर्वे आणि ओम देशमुख, प्रतीक भोसले यांच्यासह अनेक तरुण व नागरिक दरवर्षी आयोजनासाठी योगदान देत आहेत.

# अप्पूघरला 15 वर्षांची मुदतवाढ; सुरक्षेची प्रमाणपत्रेच गायब!

## ६.८३ लाखांची थकबाकी, अग्निशमन एनओसी राईड्सच्या सुरक्षा ऑडिटची माहिती नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

**निगडी येथील स्व. इंदिरा गांधी उद्यानातील सात एकरांवर विस्तारलेल्या अप्पूघर मनोरंजननगरीला निविदा प्रक्रिया न राबविता थेट १५ वर्षांची मुदतवाढ देण्यात आल्याने वाद निर्माण झाला आहे. पुष्पक अम्युजमेंट या ठेकेदार संस्थेकडे ६ लाख ८३ हजार ६६५ रुपयांची थकबाकी असतानाही हा निर्णय घेण्यात आला. विशेष म्हणजे, राईड्सचे सुरक्षा ऑडिट, विद्युत सुरक्षा प्रमाणपत्रे आणि अग्निशमन विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्राबाबतची माहिती महापालिका प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.**




निगडीतील अप्पूघर हे शहरातील प्रमुख मनोरंजन केंद्र म्हणून ओळखले जाते. महापालिकेने २००५ मध्ये हे उद्यान पुष्पक अम्युजमेंटला २१ वर्षांसाठी भाडेतत्त्वावर दिले होते. या कराराची मुदत ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपुष्टात आली. त्यानंतर ठेकेदाराने पाणीटंचाईमुळे २०१५-१६ आणि २०१६-१७ या दोन वर्षांत वॉटर पार्क बंद ठेवावा लागल्याचे कारण दिले. तसेच, कोरोना काळात मार्च २०२० ते डिसेंबर २०२२ या कालावधीत अप्पूघर आणि वॉटर पार्क बंद राहिल्याने आर्थिक नुकसान झाल्याचा दावा करत तीन वर्षांची मुदतवाढ मागितली होती.

मात्र, ठेकेदाराने तीन वर्षांची मुदतवाढ मागितली असताना त्याला थेट १५ वर्षांची मुदतवाढ देण्यात आल्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. या निर्णयासाठी नव्याने निविदा प्रक्रिया का राबविण्यात आली नाही, तसेच थकबाकी कायम असताना मुदतवाढ देण्याची आवश्यकता काय होती, असे सवाल उपस्थित केले जात आहेत. या निर्णयाला स्थानिक नगरसेवकांसह काही भाजप पदाधिकाऱ्यांचाही विरोध असल्याचे सांगण्यात येते.

महापालिकेच्या भूमी आणि जिंदगी विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, अप्पूघरातील राईड्स आणि मनोरंजन सुविधांसाठी आवश्यक परवानग्या घेतल्याची नोंद प्रशासनाकडे उपलब्ध नाही. राईड्सचे स्ट्रक्चरल ऑडिट, विद्युत सुरक्षेची प्रमाणपत्रे आणि अग्निशमन विभागाच्या एनओसीबाबतही ठोस माहिती नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आवश्यक सुरक्षा मानकांची पूर्तता झाली आहे की नाही, याबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.

याशिवाय, प्रकल्पाचे काम सुरू करण्याची आणि पूर्ण करण्याची कालमर्यादा, कामाची सद्यस्थिती आणि प्रस्तावित सुविधांबाबतची माहितीही महापालिकेकडे उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले आहे. एवढ्या मोठ्या मनोरंजन प्रकल्पाला दीर्घ मुदतवाढ देताना आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली होती का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

अप्पूघरात प्रवेश शुल्क आणि विविध राईड्सच्या शुल्काबाबतचे धोरण निश्चित झाले आहे की नाही, याचीही स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. सीसीटीव्ही यंत्रणा, सुरक्षा कर्मचारी, वैद्यकीय सुविधा, आपत्कालीन सेवा, अग्निशमन व्यवस्था आणि आपत्कालीन बाहेर पडण्याच्या मार्गांबाबतची माहितीही प्रशासनाकडे नसल्याचे सांगण्यात आले आहे.

### मुदतवाढीच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह?

एका बाजूला ठेकेदाराकडे थकबाकी कायम आहे, तर दुसऱ्या बाजूला सुरक्षा प्रमाणपत्रे आणि आवश्यक परवानग्यांबाबतची माहिती उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. अशा परिस्थितीत अप्पूघरला आणखी १५ वर्षांची मुदतवाढ देण्यामागील निकष काय होते, निविदा प्रक्रिया का टाळण्यात आली आणि पर्यटकांच्या सुरक्षेबाबत कोणती खबरदारी घेण्यात आली, याची स्पष्ट उत्तरे मिळणे आवश्यक आहे. महापालिका प्रशासनाने या प्रकरणातील कागदपत्रे, सुरक्षा तपासणी आणि मुदतवाढीच्या निर्णयाची प्रक्रिया स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे.

# राष्ट्रीय गतका स्पर्धेत आरकेएल गॅलक्सी स्कूलच्या खेळाडूंची चमक

**पिंपरी | प्रतिनिधी**

**हरियाणातील फत्तेहाबाद जिल्ह्यातील रतिया येथे झालेल्या १० व्या राष्ट्रीय सब-ज्युनिअर व ज्युनिअर गतका अजिंक्यपद स्पर्धेत आरकेएल गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. देशभरातील खेळाडूंनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याची आणि खेळातील शिस्तीची छाप पाडली.**








### शाळेकडून खेळाडूंचा विशेष सत्कार!

राष्ट्रीय स्तरावर शाळेचे व शहराचे नाव उज्वल करणाऱ्या सर्व विजयी खेळाडूंचा आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडा शिक्षकांचा आरकेएल गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या व्यवस्थापनातर्फे विशेष सत्कार करण्यात आला.

रतिया येथील गुरु नानक डिफेन्स अँड स्पोर्ट्स अकादमीमध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत आरकेएल गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ११ वर्षांखालील, १४ वर्षांखालील आणि १७ वर्षांखालील अशा विविध वयोगटांत सहभाग नोंदवला. राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत सहभागी होत विद्यार्थ्यांनी आपल्या क्रीडाकौशल्याचे प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीमुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीला प्रोत्साहन मिळाले असून, शाळेसह पिंपरी-चिंचवड शहराच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या यशाबद्दल आरकेएल गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूलचे सीईओ डॉ. पुष्कर चोबे यांनी सहभागी खेळाडूंचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांची जिद्द, कठोर परिश्रम, शिस्त आणि सातत्यपूर्ण सराव यांमुळे त्यांना राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सहभागी होऊन आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबतच त्यांच्या अंगी असलेल्या क्रीडागुणांना वाव मिळावा आणि त्यांना क्रीडा क्षेत्रात प्रगती करता यावी, यासाठी शाळा सातत्याने प्रोत्साहन देत असल्याचेही त्यांनी नमूद केले. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संघभावना, शिस्त आणि नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत होते, असेही त्यांनी सांगितले. या यशात क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

> “आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय गतका स्पर्धेत मिळवलेले यश अत्यंत अभिमानास्पद आहे. खेळाडूंनी दाखवलेली जिद्द, कठोर परिश्रम आणि शिस्त यामुळेच हे यश शक्य झाले आहे. शाळा नेहमीच विद्यार्थ्यांना शैक्षणिक विकासासोबतच क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन देते. या यशात खेळाडूंसोबतच त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे आणि पालकांचेही मोठे योगदान आहे. विजयी खेळाडूंना पुढील उज्वल भविष्यासाठी आणि क्रीडा प्रवासासाठी माझ्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा!”
>
> – डॉ. पुष्कर चोबे, (सीईओ, आरकेएल गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूल

# बीआरटी दुभाजक धुण्यासाठी महापालिकेचे टँकर!

## प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर होत असल्याचे महापालिकेचे स्पष्टीकरण




**» पुणे | प्रतिनिधी**

**शहरात पाणीटंचाईचे संकट गडद होत असताना आणि नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले जात असताना, महापालिकेच्या टँकरने बीआरटी मार्गावरील दुभाजक धुण्यात येत असल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. काळेवाडी परिसरातील या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. एकीकडे पाण्याच्या समस्येमुळे नागरिक त्रस्त असताना दुसरीकडे महापालिकेकडून टँकरने पाणी आणून दुभाजक धुण्यात येत असल्याचे दृश्य समोर आल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.**

राज्यात अनेक भागांत पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली असून, भविष्यात पाण्याचे संकट अधिक गंभीर होऊ नये, यासाठी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले जात आहे. पिंपरी-चिंचवड शहरातही पाणीपुरवठ्याबाबत नागरिकांकडून तक्रारी केल्या जात आहेत. अशा परिस्थितीत काळेवाडी परिसरात महापालिकेच्या टँकरने बीआरटी मार्गावरील दुभाजक धुण्याचा प्रकार समोर आला. भर उन्हात टँकरद्वारे दुभाजक स्वच्छ केले जात असल्याचे या व्हिडीओमध्ये दिसत असल्याने या घटनेची चर्चा सुरू झाली आहे.

शहरातील विविध भागांत नागरिकांना पुरेसे पाणी मिळावे, यासाठी प्रशासनाकडे मागण्या केल्या जात असताना सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यासाठी पाण्याचा वापर कशा पद्धतीने केला जात आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. पाणीटंचाईच्या काळात प्रत्येक थेंबाचे महत्त्व असताना अशा कामांसाठी टँकरचा वापर करणे योग्य आहे का, असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे. या प्रकाराचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसारित झाल्यानंतर महापालिका प्रशासनाच्या भूमिकेवर टीका होत आहे.

> “शहरातील रस्त्यावरील बीआरटीएसचे रेलिंग व दुभाजकांची स्वच्छता करण्यासाठी महापालिकेच्या मैलाशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर करण्यात येत आहे. ते काम महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या टँकरमार्फत करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांच्या पिण्याच्या पाणीपुरवठ्यासाठी उपलब्ध असलेल्या शुद्ध पाण्याचा वापर यासाठी केला जात नाही. पावसाळ्यामुळे रस्त्यावरील चिखल, माती व धूळ बीआरटी रेलिंग व दुभाजकांवर साचलेली आहे. या थरामुळे रेलिंगचा रंग, दुभाजकांच्या कडा व त्यावरील परावर्तक पट्टे झाकले जाऊन ते वाहनचालकांना स्पष्टपणे दिसण्यात अडथळा निर्माण झालेला आहे.”
>
> – **बापूसाहेब गायकवाड,** सहशहर अभियंता, दळणवळण विभाग, महापालिका

दरम्यान, या प्रकरणावर महापालिकेकडून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर करण्यात येत असल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. त्यामुळे दुभाजक धुण्यासाठी पिण्यायोग्य पाण्याचा वापर करण्यात आला होता का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. मात्र, पाणीटंचाईच्या काळात अशा कामांसाठी कोणत्या प्रकारचे पाणी वापरले जाते, याबाबत नागरिकांना स्पष्ट माहिती देण्याची गरज व्यक्त होत आहे.

पाणी बचतीचे आवाहन करणाऱ्या महापालिका प्रशासनाने अशा कामांमध्ये पाण्याचा वापर करताना पारदर्शकता ठेवावी, तसेच प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर होत असल्यास त्याची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर या घटनेमुळे पाण्याचा योग्य वापर आणि महापालिकेच्या कामकाजाबाबतचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

# वायसीएम रुग्णालयातील मद्यधुंद डॉक्टरवर अखेर निलंबनाची कारवाई!

**» पुणे | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात कर्तव्यावर असताना मद्यप्राशन केल्याचा गंभीर प्रकार समोर आल्यानंतर महापालिका प्रशासनाने अखेर कठोर पाऊल उचलले आहे. या प्रकरणातील वैद्यकीय अधिकारी डॉ. वैभव अविनाश म्हस्के यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी निलंबनाचे आदेश जारी केले असून, संबंधित डॉक्टरांविरुद्ध विभागीय चौकशी करण्याचेही निर्देश दिले आहेत.**





महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी अत्यावश्यक वैद्यकीय सेवा बजावत असताना डॉ. वैभव म्हस्के हे मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत आढळल्याचे रुग्णालय प्रशासनाच्या निदर्शनास आले होते. रुग्णांच्या आरोग्याशी आणि जीविताशी थेट संबंधित असलेल्या वैद्यकीय सेवेत अशा प्रकारचे गैरवर्तन समोर आल्याने रुग्णालय प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. या प्रकरणाची गंभीर दखल घेत रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांनी महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे सविस्तर अहवाल सादर केला होता.

या अहवालाच्या आधारे महापालिका प्रशासनाने संबंधित प्रकरणाची दखल घेत कारवाईची प्रक्रिया सुरू केली. शासकीय सेवेत कार्यरत असताना कर्तव्याचे पालन करणे, सेवाशिस्त राखणे आणि रुग्णांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे ही प्रत्येक वैद्यकीय अधिकाऱ्याची जबाबदारी आहे. मात्र, अत्यावश्यक सेवेत असताना मद्यप्राशन केल्याचा प्रकार समोर आल्याने महाराष्ट्र नागरी सेवा नियम आणि शासकीय आचारसंहितेच्या उल्लंघनाचा मुद्दा उपस्थित झाला आहे.

या पार्श्वभूमीवर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी डॉ. म्हस्के यांना सेवेतून निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, त्यांच्याविरुद्ध १५ दिवसांच्या आत दोषारोपपत्र दाखल करून विभागीय चौकशीची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. या चौकशीत संबंधित प्रकरणातील वस्तुस्थिती, कर्तव्यातील कसूर आणि सेवाशिस्तीचे उल्लंघन यांची तपासणी केली जाणार आहे.

दरम्यान, निलंबनाच्या कालावधीत डॉ. म्हस्के यांच्यावर काही निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यांना सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय पिंपरी येथील महापालिका मुख्यालय सोडता येणार नाही. तसेच, निलंबनाच्या काळात अन्य कोणताही व्यवसाय किंवा नोकरी करण्यासही मनाई करण्यात आली आहे.

### विभागीय चौकशीत काय निष्पन्न होणार?

महापालिका प्रशासनाने निलंबनाची कारवाई केली असली, तरी या प्रकरणातील अंतिम निर्णय विभागीय चौकशीच्या निष्कर्षांवर अवलंबून राहणार आहे. संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याकडून नेमके कोणत्या परिस्थितीत गैरवर्तन झाले, त्याचा रुग्णसेवेवर काही परिणाम झाला का आणि रुग्णालयाच्या अंतर्गत नियंत्रण यंत्रणेत काही त्रुटी होत्या का, हे मुद्देही तपासले जाणे महत्त्वाचे ठरणार आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केलेल्या या कारवाईनंतर वायसीएम रुग्णालय प्रशासन अधिक सतर्क होणार का, तसेच भविष्यात अशा प्रकारांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कोणत्या ठोस उपाययोजना केल्या जाणार, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# दुष्काळग्रस्तांसाठी 126 नगरसेवकांचे वर्षभराचे मानधन!

## मानधनाच्या प्रस्तावावरून पुणे महापालिकेत वाद; पाच कोटींच्या निधीची मागणी!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी पुणे महापालिकेतील भाजपच्या १२६ नगरसेवकांचे वर्षभराचे मानधन मुख्यमंत्री दुष्काळग्रस्त सहायता निधीला देण्याची घोषणा करण्यात आली. भाजपचे नगरसेवक धीरज घाटे आणि योगेश मुळीक यांनी यासंदर्भातील प्रस्ताव मांडला. मात्र, या प्रस्तावावरून महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सत्ताधारी भाजप आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. दुष्काळग्रस्तांना मदत करण्यास विरोध नसून, असा निर्णय घेण्यापूर्वी सर्वपक्षीय गटनेत्यांशी चर्चा करणे आवश्यक होते, असा आक्षेप काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनी घेतला.**



महापालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवारी पार पडली. राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना मदत करण्याचा मुद्दा सभेत उपस्थित करण्यात आला. भाजपने आपल्या १२६ नगरसेवकांचे वर्षभराचे मानधन दुष्काळग्रस्त सहायता निधीसाठी देण्याची भूमिका मांडली. मात्र, महापौर मंजूषा नागपुरे यांनी प्रस्ताव मांडण्यापूर्वी सर्वपक्षीय गटनेत्यांची बैठक घेतली नसल्याने विरोधकांनी नाराजी व्यक्त केली. सर्व पक्षांना विश्वासात घेऊन निर्णय घेतला असता, तर दुष्काळग्रस्तांसाठी अधिक व्यापक मदतीचा मार्ग मोकळा झाला असता, असे विरोधकांनी सांगितले.

भाजपचे नगरसेवक धीरज घाटे यांनी सर्व नगरसेवकांचे एक वर्षाचे मानधन दुष्काळग्रस्तांसाठी देण्याचा प्रस्ताव मांडला. त्यावर विरोधी पक्षनेते नीलेश निकम यांनी उपसूचना दिली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांचे एक महिन्याचे मानधन दुष्काळग्रस्तांना मदत म्हणून देण्यात येईल, असेही सांगण्यात आले. दुसरीकडे, काँग्रेसचे नगरसेवक अरविंद शिंदे यांनी प्रस्ताव मांडण्याच्या प्रक्रियेवर आक्षेप घेतला. दुष्काळग्रस्तांना मदत करण्याबाबत सर्व पक्षांशी चर्चा करून एकमताने निर्णय घेणे गरजेचे होते, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी पुणे महापालिकेच्या वतीने पाच कोटी रुपयांचा निधी देण्यात यावा, अशी मागणी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे करण्यात आली.

काँग्रेसचे गटनेते रामचंद्र ऊर्फ चंदुशेठ कदम यांनी भाजपच्या भूमिकेवर टीका केली. काँग्रेस दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. मात्र, दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीचा विचार करून महापौरांनी सर्वपक्षीय बैठक घेणे आवश्यक होते, असे त्यांनी सांगितले. इतर पक्षांशी चर्चा न करता थेट प्रस्ताव मांडणे आणि सर्व नगरसेवकांनी वर्षभराचे मानधन द्यावे, अशी भूमिका घेणे योग्य नसल्याचे कदम यांनी स्पष्ट केले. भाजप या विषयाचे राजकारण करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

विरोधी पक्षनेते नीलेश निकम यांनीही प्रस्तावाच्या प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केले. दुष्काळग्रस्तांना मदत करण्याबाबत प्रत्येक पक्षाची स्वतंत्र भूमिका असू शकते. अशा परिस्थितीत इतर पक्षांशी चर्चा न करता सर्व नगरसेवकांना गृहीत धरण्याचा अधिकार भाजपला कोणी दिला, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मदतीच्या मुद्द्यावर सर्व पक्षांना विश्वासात घेऊन निर्णय घेतला असता, तर त्याला अधिक व्यापक पाठिंबा मिळाला असता, असे मत विरोधकांनी व्यक्त केले.

दुष्काळग्रस्तांच्या मदतीच्या प्रस्तावावर चर्चा सुरू असताना काँग्रेसचे नगरसेवक सुनील शिंदे यांनी महापालिका कर्मचाऱ्यांच्या बोनसचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर भाजपचे नगरसेवक धीरज घाटे यांनी दुष्काळाचे संकट गंभीर असताना बोनसचा विषय मांडणे योग्य नसल्याचे सांगत आक्षेप घेतला.

### पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर २८ तारखेला सर्वपक्षीय बैठक!

दरम्यान, पुणे शहरातील पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी महापौर मंजूषा नागपुरे यांनी पुढाकार घेतला आहे. नागरिकांना समान पाणीपुरवठा करताना येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांबाबत चर्चा करण्यासाठी येत्या २८ तारखेला महापालिकेत सर्वपक्षीय गटनेत्यांची बैठक आयोजित करावी, अशी सूचना त्यांनी आयुक्त नवल किशोर राम यांना केली आहे.

# पुण्यात स्वच्छ हवा कार्यक्रमासाठी ४१८ कोटी खर्चूनही पुण्यात धूलिप्रदूषण कायम!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पुणे शहरातील वायुप्रदूषण कमी करण्यासाठी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत (एनसीएपी) आणि १५ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून गेल्या सात वर्षांत ४१८.४५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. त्यापैकी २७५.२८ कोटी रुपये म्हणजेच सुमारे ६६ टक्के निधी खर्च करण्यात आला आहे. मात्र, एवढा खर्च करूनही शहरातील सूक्ष्म धूलिकणांचे (पीएम-१०) प्रदूषण पूर्णपणे नियंत्रणात आलेले नाही. 'पुणे एअर ॲक्शन हब'ने याबाबत चिंता व्यक्त केली आहे.**



राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी केंद्र सरकारने विकसित केलेल्या पोर्टलवरील ताज्या आकडेवारीनुसार, पुणे शहरासाठी एकूण ४१८.४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. यामध्ये राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत ९.४५ कोटी रुपये, तर १५ व्या वित्त आयोगांतर्गत ४०९ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले. या निधीपैकी २७५.२८ कोटी रुपये विविध कामांवर खर्च झाले आहेत.

वायुप्रदूषण कमी करण्यासाठी उपलब्ध निधीचा वापर रस्त्यांच्या पायाभूत सुविधा, सार्वजनिक वाहतूक, स्मशानभूमी आणि कचरा व्यवस्थापनाशी संबंधित कामांसाठी करण्यात आला. पुणे शहरात १२१.४ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे मजबुतीकरण करण्यात आले, तर १९ किलोमीटर लांबीच्या पदपथांची दुरुस्ती करण्यात आली. रस्त्यांची सुधारणा आणि स्वच्छता यांमुळे धुळीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा होती.

रस्त्यांवरील धूळ नियंत्रित करण्यासाठी महापालिकेने दोन यांत्रिक रस्ते सफाई यंत्रे आणि १९ पाण्याचे फवारे (स्प्रिंकलर्स) कार्यान्वित केले आहेत. या यंत्रांच्या माध्यमातून रस्त्यांवरील धूळ कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. मात्र, शहरातील अनेक भागांत सुरू असलेली मेट्रोची कामे, बांधकामे आणि रस्त्यांवर साचणारी धूळ यांमुळे वायुप्रदूषणाचा प्रश्न कायम असल्याचे 'पुणे एअर ॲक्शन हब'ने निदर्शनास आणले आहे.

शहरातील वायुप्रदूषणात रस्त्यांवरील धुळीचा मोठा वाटा असल्याचे या संस्थेने नमूद केले आहे. वाहनांची वर्दळ, बांधकामांमधून बाहेर पडणारी धूळ आणि रस्त्यांच्या कडेला साचणारी माती यांमुळे सूक्ष्म धूलिकण हवेत मिसळतात. त्यामुळे नागरिकांना प्रदूषणाचा सामना करावा लागतो. निधी खर्च करून विविध उपाययोजना करण्यात आल्या असल्या, तरी त्यांचा प्रत्यक्ष परिणाम प्रदूषणाच्या पातळीवर किती झाला, याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत केवळ निधी खर्च करण्यावर भर न देता, त्यातून प्रदूषण किती कमी झाले याचेही मूल्यमापन होणे आवश्यक आहे. रस्त्यांची नियमित स्वच्छता, बांधकामांच्या ठिकाणी धूळ नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना आणि यांत्रिक सफाई यंत्रांचा योग्य वापर यांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. पुण्यातील वायुप्रदूषण कमी करण्यासाठी निधीच्या वापरासोबतच उपाययोजनांच्या परिणामकारकतेवर लक्ष केंद्रित करावे लागणार आहे.